करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०
रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१८ | पाने-१२ | दि.२१/०२/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.


Shweta Gift & Toys
श्वेता गिफ्ट अँन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप) 4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
फ्रेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

# २६ फेब्रुवारीला श्री क्षेत्र संगोबा येथील आदिनाथ महाराज यांची यात्रा

## प्रशासनाच्या वतीने सर्व तयारी

करमाळा : करमाळा तालुक्यातील सीना नदीकाठी वसलेल्या संगोबा येथील जागृत देवस्थान श्री आदिनाथ महाराज यांची महाशिवरात्री निमित्त भरणाऱ्या यात्रेची जय्यत तयारी प्रशासनाच्या विविध विभागामार्फत करण्यात आली आहे. यात्रेत सर्व सोयी सुविधा भाविकांना पुरविण्यात येत असून, भाविकांनी शांततेत यात्रा पार पाडण्यासाठी सहकार्य करावे; असे आवाहन यात्रा कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी केले आहे.

दरवर्षी महाशिवरात्रीला संगोबा येथे श्री आदिनाथ मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते. यावर्षीही यात्रेच्या दृष्टीने प्रशासनाच्या सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन सर्व अधिकाऱ्यांना सेवा सुविधा देण्याचे निर्देश तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी केले आहे. मंदिराचे आसपास बागायती क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे पार्कींग



समस्या यावर्षी उद्भवणार आहे. त्यासाठी मंदिर परिसरात व नदीतील काटेरी झाडे तसेच रस्त्याच्या कडेची काटेरी झाडे काढण्याचे काम चालू आहे. तसेच मंदिर परिसरात साफसफाईची कामे चालू आहेत. भाविकांना पिण्याचे पाण्याची सोय केली असून २० हजार लिटर पाण्याची टाकी करमाळा नगरपालिकेच्या टँकरने कायम भरून ठेवण्यात येणार आहे. तसेच पाण्याचा आरओ फिल्टरही चालू केला आहे. स्वच्छता व देखरेखीसाठी पाच माणसांची नेमणूक केली आहे. भाविकांसाठी फिरते शौचालयाची सोय करण्यात आली आहे. एकंदरीत प्रशासनाने यात्रेची जय्यत तयारी केली आहे.

यात्रेनिमित्त वासकर महाराज, देवकर महाराज, शिवलाल स्वामी महाराज व शेळगाव येथील महाराज या मानाच्या फडकऱ्यांचे किर्तनाचे कार्यक्रम रात्री नऊ ते अकरा या वेळेत होणार असून रात्री बारा नंतर वासकर महाराज व माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे अभिषेक होतात. त्यानंतर पहाटे पाच ते आठ भाविकांचे अभिषेक व नंतर दर्शनासाठी मंदिर खुले केले जाणार आहे.

(पान नं.६ वर..)

ग्राम महसुल अधिकारी

करमाळा येथील रहिवाशी व आमचे मित्र
श्री.शिवकुमार(शेठ) चिवटे
यांच्या सौभाग्यवती

सौ.ऋतुजा शिवकुमार चिवटे (हिंगमिरे)
यांची हिवरे (नागोबाचे) येथे 'ग्राम महसुल अधिकारी' (तलाठी) पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक
• गणेश हलवाई • सागर वनारसे • रोहित कोरपे
• गणेश ममदापुरे • दुर्गेश कोकीळ • ओंकार ढाळे
• अजय पुराणिक • विक्रांत शिंदे • प्रतिक गांधी
• केतन इंदुरे करमाळा., जि.सोलापूर

'राजकारण' हे विकासाचे आणि माणसांना जोडणारे पाहिजे....!

**संपादकीय..........................................!**

# मजबुत पायाची गरज..!

विधानसभा निवडणूकीत नुतन आमदार नारायण आबा पाटील हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. असेच मतदान पडावे असे वाटत असेलतर भविष्याचे नियोजन त्यांना करावे लागणार आहे. त्यासाठी सुरूवातीपासूनच प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्य कोणा नेत्याला पुढे यायचे असेलतर त्यांना सुध्दा आत्तापासून प्रयत्न करावे लागणार आहेत.

इमारत असो नाहीतर कोणतेही राजकारण असो. त्यासाठी पाया मजबूत असावा लागतो. जेवढा मजबूत पाया तेवढी इमारत टिकावू रहाते तसेच राजकारणातही जेवढा पाया मजबूत तेवढी सत्ता मिळत जाते. हे सुत्र असल्याने अनेकजण आपला पाया मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत असतात. जिल्ह्यात व राज्यात अनेक नेते वर्षानुवर्षे वेगवेगळ्या सत्तेवर टिकून आहेत किंवा समाजात त्यांचे स्थान टिकून आहे. बारामतीचे पवार, अकलूजचे मोहिते-पाटील, प्रवरानगरचे विखे-पाटील घराणे. आदी प्रस्थापित घराण्याचा आदर्श घेऊन प्रत्येक जिल्ह्यात अनेक राजकर्त्यांनी स्वत:चे अस्तित्व वाढवले आहे.

आपल्या तालुक्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे, माढ्याचे माजी आमदार व त्यांचे बंधु बबनराव शिंदे या दोघांनी राजकिय पार्श्वभुमी मजबूत होण्यासाठी साखर कारखाने व तत्सम उद्योग उभे केले आहेत. किंबहुना त्याच जोरावर ते राजकारणात टिकून आहेत. नुकत्याच विधानसभा निवडणुकीत शिंदे बंधूची हार झाली असलीतरी ते उद्योगाच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, वाहतूक ठेकेदार, व्यापारी यांच्याशी कायम संपर्कात रहाणार, यात शंका नाही. सत्ता गेलीतरी हाती पर्याय असेलतर सत्ता पुन्हा येत रहाते हे अकलूजकरांच्या अनुभवावरून लक्षात येते. आपल्या तालुक्यातील नेतेमंडळी सत्तेत येतात, पण सत्ता कायम टिकवण्यासाठी योग्य ते नियोजन करत नाहीत. बागल गटाकडे दोन साखर कारखाने होते. सत्ता गेली पण जर त्यांनी ते कारखाने जोमाने चालवले असते तर ते पुन्हा सत्तास्थानी दिसले असते. दुर्दैवाने कारखानदारीकडे योग्य लक्ष न दिल्यामुळे त्याच कारखान्यांनी त्यांना सत्तेपासून दुर ठेवले आहे. थोडक्यात काय तर तालुक्यातील नेत्यांनी अद्याप पाहिजे तसा त्यांचा पाया मजबूत केलेला नाही., त्यामुळे नेत्यांची सत्ता गेल्यानंतर त्यांना खुपच अडचणी येतात. पुन्हा सत्तेच्या प्रवाहात यायचेतर त्यांना अनंत अडचणींना सामना करावा लागतो. पद गेल्यानंतर पुन्हा पद मिळेपर्यंत तालुक्यातील नागरिकांच्या संपर्कात राहणे, त्यांची कामे करणे, गावागावात भेटीसाठी वाहनांची यंत्रणा, काम करण्यासाठी कर्मचारी कसे उपलब्ध करणार..? जर तुमच्या हाताशी कारखाना, सुत गिरणी, मोठी शिक्षण संस्था, मोठा उद्योगसमुह असेलतर तुमच्याकडे पद असो नाहीतर नसो तुमच्यावर फार मोठा परिणाम होत नाही व जनतेवर सुध्दा फारसा परिणाम जाणवत नाही. जेंव्हा तुम्ही जनमानसात असता, तेंव्हा तुम्हाला पुन्हा सत्तेत यायला काही अडचण रहात नाही परंतू तुम्ही फक्त निवडणुकीपुरतेच जनमाणसात गेला तर जनता तुम्हाला दारातही उभे करत नाही, ही गोष्ट महत्वाची आहे.

आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे जेंव्हा तुमच्या सोबत माणसं, कार्यकर्ते, साधनं असतात तेंव्हा सत्तेविना अधिकारी आदर करतात व एका फोन मध्ये तुमच्या कार्यकर्त्यांची कामे करतात. त्याशिवाय ज्यांच्याकडे हे सर्व असते त्यांना जिल्ह्यातील, राज्यातील गॉडफादर सहज मिळतात. अलीकडे गॉडफादर शिवाय महत्वाची कामे होत नाहीत. आदिनाथ कारखान्याच्या समस्या सोडवण्यासाठी गॉडफादरनी यांना मदत करा.. एवढे म्हटले असतेतरी बँकानी सहज आवश्यक ती आर्थिक मदत केली असती व कारखान्याची कठीण स्थिती झाली नसती, ही बाब विशेष आहे. शासकीय पातळीवरील कामासाठी सत्ताकारणातील एकतरी माणूस आपल्या पाठीशी असावा लागतो, मगच वरच्या पातळीवरील सर्व कामे मार्गी लागतात.

भाजपा काळात गटबाजी नव्हती कारण त्यांना माणसं जोडायची होती, पक्ष वाढवायचा होता म्हणून ते येईल त्याला आपलसं करून मदत करत होते, सध्या तसे नाही. तीन पक्षाचे सरकार आहे. प्रत्येक पक्षाचे नेते वेगळे व त्यांचे कार्यकर्ते वेगळे. येथे लॉबी असून त्या लॉबीतून गेलेतरच कामे होतात. थोडक्यात तालुक्यात आणि वरती संपर्क हवा असेलतर तुम्हाला पाया मजबूत केला पाहिजे.

सध्या तालुक्यातील प्रस्थापित गटापैकी पाटील गट, जगताप गट, शिंदे गट, बागल गट आणि दत्तकला परिवार यांना अजुनही खुप वाव आहे. तालुक्यात मोठी शिक्षण संस्था नाही. मेडीकल, इंजीनीअरींग वा तत्सम शिक्षणाच्या सुविधा येथे नाहीत. त्यामध्येही काम करता येवू शकेल. विशेष म्हणजे सर्व गटाकडे शिक्षण संस्था आहेत, परंतू त्या अत्यंत जुजबी असून त्याचा फायदा ना जनतेला ना नेत्याला. याशिवाय गेल्या २८ वर्षापासून येथे एम.आय.डी.सी. मंजूर आहे. १२५ एकर जमीन संपादीत केली आहे. त्यात एकही उद्योग उभा नाही, जर एखाद्या नेत्याने त्यामध्ये मोठा उद्योग उभा केला तर शेकडो लोकांना काम मिळेल व तालुक्याची व नेत्याची प्रगती होईल. करमाळा सोडलेतर अन्यत्र कोठेही औद्योगिक वसाहत नाही, केम येथील औद्योगिक वसाहत अपुर्णच आहे. जर औद्योगिक वसाहत उभी केलीतर त्यातून अनेकांशी संपर्क येवू शकतो व मोठी समाजसेवा होवू शकते. करमाळा तालुक्यात अद्याप एकही अद्ययावत हॉस्पीटल नाही. नोबल, दिनानाथ मंगेशकर, सह्याद्री, आश्विनी याप्रमाणे मोठे हॉस्पीटल उभारले तर सर्वसामान्यांची सोय तर होईलच पण अनेकांचे जीव वाचतील, समाजसेवा होईल.

याशिवाय शेती पुरक व्यवसाय केलेतर, अनेकांना रोजगार मिळेल व शेतकऱ्यांना न्याय मिळेल. सुदैवाने उजनी धरण आपल्या जवळ आहे. त्यावर पर्यटनापासून ते मत्स्यमारी पर्यंत व अत्याधुनिक शेती पासून ते शेतीविषयक कारखानदारी पर्यंत अनेक व्यवसाय येथे उभे राहू शकतात. त्यामुळे तालुक्याचे नाव तर होईलच पण अनेकांना रोजगार मिळेल, शेतीचा सन्मान वाढेल व राजकर्त्यांचा पाया मजबूत होईल. पण हे सर्व करताना तालुक्यातील सर्वसामान्या वर अन्याय करून अथवा त्यांना फसवून मोठे उद्योग उभे केलेतर तो पाया मजबूत न होता ठिसूळ होईल; हे पण लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे नेत्यांनी भविष्यातील मजबूत राजकारणासाठी स्वत:चे पाय मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत ही अपेक्षा..!

***

## रेडिओ प्रेमी बाळासाहेब पवार यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.): रेडिओ दिनानिमित्त रेडिओप्रेमी व हिवरवाडीचे माजी सरपंच बाळासाहेब पवार यांचा सत्कार करण्यात आला. पवार यांचे तहसील परिसरात हॉटेल आहे. ते १९९० पासून रेडिओ वापरत आहेत. आजच्या आधुनिक युगात देखील पवार यांनी रेडिओ ऐकण्याचा छंद कायम ठेवला आहे. स्मार्ट फोनच्या युगात आजही ते रेडिओवरील गाणे ऐकतात. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष वारे, माजी नगरसेवक अतुल फंड, रमेश कांबळे, नासीर कबीर, जयंत दळवी, अशोक नरसाळे, केरू गव्हाणे आदीजण उपस्थित होते.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत आश्लेषा बागडे ब्रांझ पदकाची मानकरी




करमाळा(सं.प्र.) : उत्तराखंड येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील महिला पैलवान आश्लेषा बागडे हिने तृतीय क्रमांक पटकावून ब्रांझ पदक मिळवले आहे. आश्लेषा हिने संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करत आपल्या लौकीकाला साजेल असा खेळ केला. सेमी फायनल मध्ये तिने हरत असलेली कुस्ती अत्यंत कुशलतेने खेळून दमदार विजयात रूपांतर केले. तिला महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण शिक्षक प्रा.राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे अभिनंदन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, संभाजी किर्दाक यांनी केले.

**विकणे आहे**

एस.टी.कॉलनीतील कॉर्नरला असलेला बंगला व पावणेतीन गुंठे जागा विकणे आहे

संपर्क : 9423237685

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# ५६ हजार बचतीतून उभे केले ३५ लाख


## पोफळज येथील बचत गटाचा उपक्रम

करमाळा (सं.प्र.) : आपण नेहमीच म्हणतो, थेंबे थेंबे तळे साचे.. अशाचप्रकारे छोटीसी बचत ही लाखाच्या स्वरूपात वाढते. याची अनुभूती पोफळज येथील स्वामी समर्थ व महालक्ष्मी महिला बचत गट अशा दोन गटाच्या कार्यातून आली आहे. ५६ हजार ५०० रुपयाची बचत १ जानेवारी २०२० ला केली. १ डिसेंबर २०२४ ला या बचत गटाचे ३५ लाख ८७ हजार २८९ रुपये निर्माण झाले आहे. हे काम या बचत गटाच्या संचालिका नंदा मारूती आढाव रा.पोफळज यांच्या कुशल प्रयत्नातून परिपूर्ण झाले आहे.

पोफळज येथे स्वामी समर्थ बचत गटात २६ महिला तर महालक्ष्मी महिला बचत गटात २५ महिला आहेत. या दोन्ही गटाची सुरूवात १ जानेवारी २०२० ला झाली. त्यावेळी प्रत्येक महिलेकडून ५०० रूपये दर महिन्याचा पहिला हप्ता व १ हजार रुपयाची ठेव घेतली होती. असे पहिल्या महिन्यात ५६ हजार ५०० रूपये जमा झाले होते. या बचत गटाचा वेलू हळूहळू गगनाला भिडला आहे. १ डिसेंबर २०२४ ला या बचत गटाच्या प्रत्येक महिलेला ७० हजार ३३९ रूपये देण्यात आले आहेत. थोडक्यात महिलेची पाच वर्षाची बचत ३१ हजारावर दुप्पट रक्कम मिळाली आहे.

महिलांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी काहीतरी माध्यम पाहिजे. याचा विचार करून मी १ जानेवारी २०२० ला स्वामी समर्थ व महालक्ष्मी महिला बचत गट असे दोन बचत गट सुरु केले. एका गटात २६ तर एका गटात २५ सदस्या घेतल्या. त्यांच्याकडून प्रत्येकी १ हजार रूपये ठेव म्हणून व ५०० रूपये बचत म्हणून दरमहा घेण्याचे ठरविले. सुरूवातीला ५६ हजार ५०० रूपये. त्यानंतर दरमहा २५ हजार ५०० रूपये जमा करत गेले. ही रक्कम विदर्भ कोकण ग्रामीण बँक, शाखा - जेऊर येथे खाते उघडून ठेवली. लागेल त्याला आम्ही कर्ज देत गेलो. त्यातून आमची पाच वर्षात ३५ लाख ८७ हजार २८९ एवढी रक्कम जमा झाली. ती आम्ही प्रत्येक महिलांना समान हिश्याने ७० हजार ३८९ प्रमाणे दिले आहेत. हा अनुभव पाहून ३० महिलांचा आणखी एक तिसरा बचत गट सावित्री महिला बचत गट म्हणून नुकताच कार्यरत केला आहे.

**...नंदा मारूती आढाव**
(बचत गट संचालिका) मो.९६६५१९८०५०



# प्रियंका आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॅटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# कॅन्सर पेशंटला आर्थिक मदतीचे आवाहन



करमाळा(सं.प्र.) : पोथरे येथील सौ.सुमन रेवण शिंदे या कॅन्सरग्रस्त असून त्यांना सी-क्युअर कॅन्सर हॉस्पीटल, आळेफाटा, ता.जुन्नर येथे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचारासाठी सहा लाख रुपये खर्च येत असल्याचे डॉ.अमोल डुमरे यांनी म्हटले आहे. सौ.शिंदे यांचे पती रेवण शिंदे हे अत्यंत गरीब कुटूंबातील असून त्यांचेवर उपचार करण्याची त्यांची ऐपत नाही. त्यामुळे त्यांना मदतीची आवश्यकता आहे. सौ.शिंदे यांना १२ केमो घेण्यास सांगितले असून, एका केमोसाठी किमान ५० ते ५५ हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे त्यांना मदतीची गरज असून समाजातील दानशूर मंडळींनी त्यांना मदत करावी; असे आवाहन डॉ.डुमरे यांनी केले आहे. मदतीसाठी युनियन बँक, खाते नं.४७०५० २०१००१४५७६ आयएफसी कोड युबीआय एनओ ५४७०५१ असा असून, सी क्युअर हॉस्पीटलचा खाते क्र. बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.६०२४२८१७०७६, आयएफसी कोड एमएएचबी ०००१३० असा आहे. तरी सौ.सुमन शिंदे यांना नागरीकांनी मदत करावी; असेही आवाहन डॉ.डुमरे यांनी केले आहे.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.**

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा

# अनुजा दातांचा दवाखाना









वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

उपलब्ध सुविधा...









- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
- मुख कर्करोग निदान

कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली
## टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

**• नेपाळ दर्शन** काशी, आयोध्या, प्रयागसह.. (रेल्वे प्रवास ३ एसी)
कालावधी : दि.२१/३/२०२५ ते ३/४/२०२५
सहल खर्च रू.२७,५००

**• शिमला-कुलू-मनाली** विमान प्रवास
कालावधी : दि.१/४/२०२५ ते दि.९/४/२०२५
सहल खर्च रू.२६,५००

**• गंगासागर दर्शन**
गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.१७/४/२०२५ ते २५/४/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

**• गुजरात दर्शन**
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
कालावधी : दि.१/५/२०२५ ते ९/५/२०२५
सहल खर्च : रू.११,०००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.१२/५/२०२५ ते २४/५/२०२५
सहल खर्च रू.३०,५०० (रेल्वे प्रवास ३ एसी)

**• कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२६/५/२०२५ ते ४/६/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• चारधाम दर्शन**
कालावधी : दि.१०/६/२०२५ ते २५/६/२०२५
सहल खर्च : रू.३५,०००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



**बुकींग सुरू**

संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

# समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O) | डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

**उपलब्ध सुविधा..** • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक

**महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)**

• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

## शेलगाव(वांगी) येथे २३ फेब्रुवारीला मोफत सर्वरोग निदान शिबीर


करमाळा(सं.प्र.) : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी व अष्टविनायक मित्र मंडळ, शेलगाव (वांगी) यांचे संयुक्त विद्यमाने कर्मवीर डॉ.जगदाळे मामासाहेब यांच्या जयंतीनिमित्त २३ फेब्रुवारीला मोफत सर्वरोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर जिल्हापरिषद प्राथमिक शाळा शेलगाव(वांगी) येथे सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेत संपन्न होणार आहे. या शिबीरात मेडिसीन विभाग, न्युरोसर्जरी, हृदयरोग, श्वसनविकार व अतिदक्षता, जनरल सर्जरी, पॅथॉलॉजी, नवजात शिशु, अस्थिरोग, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र, रेडिओलॉजी, भुलशास्त्र, मानसशास्त्र, आयुर्वेद, होमिओपॅथी, फिजीओथेरपी, आहारतज्ञ, त्वचारोग व कान-नाक-घसा अशा विविध विभागातील तज्ञ डॉक्टर रूग्णांची तपासणी करून उपचार करणार आहेत. या शिबीरात मोफत इसीजी सोय असून ब्लड शुगर व ब्लडप्रेशरची मोफत तपासणी केली जाणार आहे. शिबीरातील रूग्णांसाठी ऑपरेशन करीता विशेष सवलत राहणार आहे. या शिबीराचा लाभ नागरीकांनी घ्यावा; असे आवाहन अष्टविनायक तरूण मंडळ शेलगाव(वांगी) यांनी केले आहे.

## सोनारमामा यांच्या पुण्यतिथीनिमित्त हरिनाम सप्ताह

करमाळा(सं.प्र.): श्री ब्रह्मानुभवी श्रोत्रिय सद्गुरू स्वरूप ह.भ.प.राधाकृष्ण महाराज उर्फ सोनार मामा यांच्या पुण्यतिथी निमित्त २३ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व रात्री किर्तन, हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात कांबळे सर, कदम सर, वेदांत उदावंत, मंदाकिनी पवार, श्रेणी उदावंत, निर्मला ननवरे, भारती सपकाळ, विठ्ठल भणगे, सुमन रोकडे, अतुल शहाणे, आरती शहाणे, ज्योतीताई भांडवलकर, ज्योतीताई दुरंदे, सत्यभामा बनसुडे, सुनिता यादव, विजयाताई शहाणे, ढुबे सर, मीराताई फंड यांचे प्रवचनाचे कार्यक्रम होणार असून संदीपान महाराज बारसकर (सोलापूर), अभयकुमार शहाणे (करमाळा), प्रकाश महाराज माशाळ (डोंबाळवाडी), मंदर उर्फ बाळासाहेब कुलकर्णी (निंभोरे), विवेकानंद मंजरतकर महाराज (जामखेड), कल्याण महाराज बागडे (पुणे) यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. १ मार्चला सकाळी दहा ते बारा यावेळेत पुण्यतिथीचे किर्तन ह.भ.प.सद्गुरू नंदानंद कुलकर्णी महाराज यांचे श्रीदेवीचामाळ समाधी मंदिर समोर आहे. पुष्पांजलीनंतर भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. हा सप्ताह श्री विठ्ठल मंदिर गुजरगल्ली येथे होणार आहे.

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

# चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाश्ता | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

घोलप हार्डवेअर
● प्लंबिंग मटेरियल
● नट बोल्ट
● मग ● झाडू ● टब
● कॅरेट ● ताडपत्री
● नायलॉन दोर
● प्लास्टीक कागद
कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.
संपर्क : मो.9922111204
पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.

# सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा उत्साही वातावरणात संपन्न

## २७ नव वधू-वर विवाहबध्द



करमाळा(सं.प्र.): श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेला सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा उत्साही व आनंदमयी वातावरणात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात २७ नव वधू–वर विवाहबध्द झाले. यावेळी वधू–वरांना विवाहासाठी लागणारे सर्व साहित्य देण्यात आले. या कार्यक्रमासाठी पालकमंत्री ना.जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, संजयमामा शिंदे, वैद्यकिय मदत कक्षाचे मंगेश चिवटे, गहिणीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज, शिवाचार्य वेळापूरकर महाराज, माढेकर महाराज, परांडेकर महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यासाठी तालुक्यातील नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी दहा ते रात्री दहा पर्यंत १५ हजार लोकांची जेवणाची सोय करण्यात आली होती. करमाळा शहरातून ढोलताशा, बॅन्जो व फटाक्यांच्या आताषबाजीत नवदेवाची घोड्यावरून मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीने शहरातील नागरीकांचे लक्ष वेधून घेतले होते. गणेश चिवटे हे अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवत असून त्यांचे सामाजिक कार्य हे आदर्शवत आहे. त्यांनी राबवलेला सामुदायिक विवाह सोहळ्याचा कार्यक्रम हा प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे. समाजातील प्रत्येक घटकातील नागरीकांना या माध्यमातून दिलासा देण्याचे काम चिवटे यांच्या माध्यमातून होत असल्याचे मत प्रत्येक नागरीकातून व्यक्त होत आहे. हा विवाह सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्याकामी श्रीराम प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### महसुल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल

# चिखलठाण येथील आकाश गलांडे व विद्या बारकुंड यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.): सरळसेवा परीक्षेतून चिखलठाण येथील आकाश दिलीप गलांडे व विद्या पांडूरंग बारकुंड यांची महसुल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा चिखलठाण ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाचे आयोजन जिल्हापरिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांनी केले होते. सुत्रसंचालन ग्रामसेवक श्रीकांत बारकुंड यांनी केले. यावेळी सरपंच प्रतिनिधी विकास गलांडे, पोलीस पाटील गायकवाड, हेमंत बारकुंड, चंद्रकांत सुरवसे, बालाजी पवार, दिलीप गलांडे, पांडूरंग बारकुंड, सतीश बनसोडे, धनाजी बारकुंड, फिरोज तांबोळी यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांचे आभार बारकुंड यांनी मानले.

### भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या कार्यक्रमासाठी

# दत्तकला फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग महाविद्यालयाची निवड

करमाळा(सं.प्र.): भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) द्वारे आयोजित शैक्षणिक कार्यक्रमासाठी दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग या महाविद्यालयाची निवड झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत तीन महिने, दोन महिने, एक महिना आणि सहा दिवस असे विविध कालावधीचे अभ्यासक्रम विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी राबवले जातील. या अभ्यासक्रमासाठी नोंदणी केल्यानंतर महाविद्यालयास तसेच सहभागी विद्यार्थ्यास शासकीय प्रमाणपत्र प्राप्त होईल. विशेष म्हणजे या उपक्रमाचा भाग असल्याने पुढील एक ते दोन वर्षात विद्यार्थ्यांना ISRO केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार आहे. हा अभिमानास्पद क्षण असून विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अंतराळ क्षेत्रात नवीन दारे उघडणशरा महत्वाचा टप्पा ठरणार आहे; असे मत दत्तकला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी व्यक्त केले. या कोर्सेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास पुरक सर्टिफिकेटस मिळून प्लेसमेंट करीत मदत होऊ शकते. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा; असे मत प्राचार्य डॉ.एस.ए.पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

पान १ वरून पुढे....

# २६ फेब्रुवारीला संगोबा येथील आदिनाथ महाराज यांची यात्रा

## स्वतंत्र आरोग्य कक्षाची स्थापना

यात्रा काळात भाविक भक्तांना शारिरीक त्रास झाल्यास आरोग्य कक्षाची यंत्रणा वरकुटे प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत करण्यात आली आहे. डॉ.कुंदळे यांचेसह पाच आरोग्य कर्मचारी तीन दिवस या ठिकाणी सेवा देणार आहेत. कोणालाही त्रास झाल्यास आरोग्य कक्षाशी संपर्क साधावा.

...डॉ.कुंदळे (प्राथ.आ.केंद्र वरकुटे)

## स्वतंत्र मदत कक्षाची उभारणी

यात्रेत कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी स्वतंत्र मदत कक्ष उभारण्यात आला आहे. नागरीकांना काही अडचण व त्रास जाणवल्यास तात्काळ मदत कक्षाच्या क्रमांकाशी संपर्क करावा. येथे हमीद शेख हे कर्मचारी कायम राहणार आहेत. संपर्क क्र.९८५०६८५६२५, ९३७३७२५५२४, ९८९०६०८२८४

...हरिभाऊ दरवडे (ग्रामविकास अधिकारी, ग्रा.पं.पोथरे)

## जीर्णोध्दारासाठी मदतीचे आवाहन

मंदिर जीर्णोध्दाराचे काम गेल्या वर्षी पासून चालू आहे. लोकवर्गणीतून ४ लाख ५७ हजार २२२ रूपये जमा झाले होते. यापैकी ५ लाख ४१ हजार ५५० रूपये बांधकामासाठी खर्च केले आहेत. या लोकवर्गणीतून बाहेरील दगडी कट्टा , झाडांना दगडी ओटे, घाटाच्या दगडी पायऱ्या, आतील पायऱ्या बांधणे, वरवंड बांधकाम, आतील सर्व स्वच्छता, मुख्य प्रवेशद्वारावर एलईडी बोर्ड लावणे आदी कामे केली आहेत. यापुढील काळात मंदिराच्या आतील व बाहेरील बाजुला, मंदिरा व्यतिरिक्त बांधकामाला रंगकाम करणे, जुना कलर काढणे, मंदिर परिसरातील लाईट फिटींग करणे व हायमास्ट दिवे दुरूस्त करणे. परिसरात मुरूम भरून झाडे लावणे, बंधाऱ्या जवळील बस स्टॅन्ड समोर भव्य प्रवेशद्वार करणे, सेल्फी पॉईंटसाठी घाट परिसरात लॉन करणे इ.कामे लोकवर्गणीतून होणार आहे.. भाविकांनी जीर्णोध्दारा साठी सढळ हाताने मदत करावी. **संपर्क-विनय ननवरे (९८५०१११३३१) महेश निकत (९८६०८७८२३४)**

## भाविकांनी एस.टी.ने प्रवास करावा

यात्रेनिमित्त करमाळा बसस्थानक व संगोबा येथे निवारा शेड उभारले आहे. या यात्रेत अंदाजे एसटीच्या दोनशे फेऱ्या होतील. त्यासाठी १३ ते १४ बसेस उपलब्ध केल्या आहेत. प्रवाशांची संख्या वाढली तर तशी गाड्यांची संख्या वाढवून फेऱ्या वाढविल्या जातील. प्रवाशांनी खासगी वाहनातून प्रवास न करता परिवहन महामंडळाच्या बसनेच प्रवास करावा. या प्रवासात शासनाने निर्देशित केलेल्या योजनांचा लाभ प्रवाशांना मिळू शकेल; असे प्रतिपादन आगार व्यवस्थापक विरेंद्र होनराव यांनी सांगितले.

यात्रेसाठी आवश्यक तेवढा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. यात्रेत कोणताही अनुचित प्रकार व गडबड गोंधळ होऊ नये यासाठी रांगेत सर्वांनी दर्शन घेणे गरजेचे आहे. काही त्रास व अडचण जाणवल्यास मदत कक्ष व पोलीसांशी संपर्क साधावा.

...विनोद घुगे (पोलीस निरीक्षक, करमाळा)


हार्दिक अभिनंदन



करमाळा येथील
डॉ.राजेश मेहता व डॉ.सौ.सुजाता मेहता
यांचे द्वितीय चिरंजीव
डॉ.अपूर्व राजेश मेहता
यांची सोलापूर येथील डॉ.वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकिय महाविद्यालय (सिव्हील रूग्णालय) येथे MD (Anaesthesia and critical care) साठी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक
श्री.मनोज गांधी, श्री.आकाश मनोज गांधी
समस्त गांधी परिवार, करमाळा.
सुरज ऑटोमोबाईल, पोथरनाका, करमाळा., जि.सोलापूर



कॉलेज, होस्टल, कोर्सेससाठी उपयुक्त

इमारत विकणे आहे



- ७०० स्क्वे.फुटाचे आठ व ५०० स्क्वे.फुटाचा एक फ्लॅट
- वास्तुशास्त्राप्रमाणे फ्लॅटचे बांधकाम
- प्रत्येक फ्लॅटला बाल्कनी
- पाणी साठविण्यास आठ हजार लिटरची टाकी
- टू-व्हीलर पार्किंगची सोय
- पुर्वेकडे आठ गुंठे ओपन गार्डन प्लॉट
- बिल्डींगच्या सुरक्षेसाठी कंपाउंडवॉल
- बिल्डींग जी प्लस चार असून प्रत्येक मजल्यावर दोन फ्लॅट.
- वरती जाण्यासाठी लिफ्टची सोय
- सदर इमारतीचे प्लॅनिंगच्या नियमानूसार बांधकाम
- कमलादेवीच्या मंदिरापासून पाच मिनीटाच्या अंतरावर
- प्रत्येक फ्लॅटमध्ये ग्रॅनाईटचे किचन ओटे व रॅक
- जिन्याची रूंदी चार फूट असून सर्व जिन्यांना ग्रॅनाईटचे टप्पे

संपर्क

महेश सुर्यपुजारी मो.7709669288 | अजित साठे मो.9763046715 | नरेंद्र ठाकूर मो.9423333975

पत्ता : गजानन हौसिंग सोसायटी, ७२ बंगल्याजवळ, संगोबा रोड, करमाळा.



ग्राम महसुल अधिकारी







आमचे मित्र श्री.शिवकुमार(शेठ) चिवटे
यांच्या सौभाग्यवती
सौ.ऋतुजा चिवटे (हिंगमिरे)
यांची हिवरे(नागोबाचे) येथे
